जा.क्र.- शिछपु/अर्ज/२००५-०६/का-१

क्रीडा व युवकसेवा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
दिनांक :-६.११.२००६.

**प्रति,**
मा.सचिव/ अध्यक्ष,
एकविध खेळांच्या सर्व राज्य संघटना,
महाराष्ट्र राज्य.

**विषय :** दादोजी कोंडदेव पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू, अपंग खेळाडू, संघटक / कार्यकर्ते) सन २००५-२००६ शिफारस करण्याबाबत..

**संदर्भ :** १) शासन निर्णय क्र. शिछपु-२००२/प्र.क्र७३/क्रीयुसे-२, दि. ९ जानेवारी, २००३
२) शासन निर्णय क्र. शिछपु-२००२/प्र.क्र७३/क्रीयुसे-२, दि. १९ ऑक्टोबर, २००६.

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय शासन निर्णयान्वये विहित केलेल्या नियमानुसार सन २००५-२००६ या वर्षाच्या पुरस्काराकरिता दादोजी कोंडदेव पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू,अपंग खेळाडू संघटक/कार्यकर्ते ) तसेच विशेष पुरस्काराकरिता (साहसी उपक्रम) विहित नमुन्यात अर्ज दि.१५ डिसेंबर, २००६ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे.

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारासाठी सर्वोत्कृष्ट कामगिरी संपादन केलेल्या दोन खेळाडूंचे (१ पुरुष व १ महिला खेळाडू) विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्रासह संचालनालयाकडे पाठविण्यात यावेत. त्याचप्रमाणे दादोजी कोंडदेव पुरस्कारासाठी एखाद्या क्रीडा मार्गदर्शकाने संघटनेकडे अर्जाची प्रत पाठविली असल्यास आपल्या अभिप्रायांसह असे प्रस्ताव संचालनालयास पाठविता येतील. वरील सर्व पुरस्कारांचे अर्ज पाठवितांना आवश्यकत्या सर्व प्रमाणपत्रांच्या **साक्षांकित प्रती** अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अर्जासोबत कोणतीही वृत्तपत्रीय कात्रणे जोडू नयेत.

खाली नमुद केलेल्या मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करुन त्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत आहेत याची खात्री केल्यानंतरच अर्ज संघटनेच्या ठरावासह या संचालनालयास आपल्या शिफारशीसह सादर करावेत.

१. विहीत नमुन्यातील परिपूर्ण अर्ज.

एखाद्या मार्गदर्शक / खेळाडू अर्जदाराने या संचालनालयाकडे थेट अर्ज सादर केला असेल व त्याची एक प्रत आपल्या संघटनेकडे पाठविली असल्यास अर्जदाराच्या कामगिरीची पडताळणी शासनाने विहित केलेल्या नियमांनुसार करुन त्यावर आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय संघटनेच्या ठरावासह तसेच संघटनेमार्फत थेट शिफारस केलेल्या खेळाडू/मार्गदर्शकाचे अर्ज संघटनेच्या ठरावासह दिनांक १५ डिसेंबर, २००६पर्यन्त संचालक,क्रीडा व युवकसेवा,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे गोपनीय स्वरुपात पाठवावेत. अपूर्ण व विहित मुदतीनंतर प्राप्त होणा-या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, व त्याची कोणतीही जबाबदारी या संचालनालयावर राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

(ना.रु.श्रोते.),
सहसंचालक,
क्रीडा व युवकसेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे

(स्वाक्षरीत. मा. संचालकांनी. अनुमोदीत.),

0000